# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in


जा.क्र. गो.वि./आस्था./३४५७/२०२६ दि. १४/१०/२०२६

## परिपत्रक

**विषय:** विद्यार्थी परिषद निवडणूकासंदर्भात विहीत मुद्यांच्या अनुषंगाने अभिप्राय सादर करणेबाबत.

**संदर्भ:** मुंबई विद्यापीठाचे पत्र दि. 06/10/2026 प्राप्त आक्र आस्था./4109, दि.09/10/2026.

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, विद्यार्थी परिषद निवडणूकासंदर्भात अभ्यास व सल्लामसलत करण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समितीचे गठन करण्यात आले आहे. समितीने यासंदर्भात आपले कामकाज सुरु केले आहे.

विद्यार्थी परिषद निवडणुका निकोप, मुक्त व निर्भय, शांततापूर्ण, पारदर्शक वातावरणात पार पडण्यासाठी तसेच महाविद्यालये, विद्यापीठे यांच्या भागधारक (Stakeholder) यांची मते जाणून घेण्याचा समितीचा मानस आहे.

त्याअनुषंगाने विद्यापीठातील मा. कुलगुरू, मा.प्र. कुलगुरू, मा. कुलसचिव, संचालक, विविध प्राधिकरणांचे प्रतिनिधी, तसेच शैक्षणिक संस्थांचे प्रमुख, व्यवस्थापन प्रतिनिधी, प्राचार्य, विभाग प्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, पालक तसेच विद्यार्थी यांनी यासोबत जोडलेल्या प्रपत्रात नमूद मुद्यांच्या अनुषंगाने अभिप्राय संकलित करून पाठविण्याबाबत मुंबई विद्यापीठाचे संदर्भिय पत्र प्राप्त झाले आहे.

करीता सर्व संबंधितांनी यासोबत जोडलेल्या प्रपत्रात नमूद मुद्यांच्या अनुषंगाने आपला अभिप्राय PDF आणि MS-Word स्वरुपात establishment.section@unigug.ac.in या e-mail वर दि. 22/10/2026 पर्यंत पाठवावा.

संलग्न – वरीलप्रमाणे

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी :-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
३. सर्व प्राधिकरणांचे मा. सदस्य, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
५. सर्व प्रशासकिय/शैक्षणिक विभागांचे मा. विभाग प्रमुख / समन्वयक/कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
६. मा. विभागप्रमुख / अधिक्षक, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त विद्यार्थी व विद्यार्थींनी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
७. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
८. सहा. कुलसचिव / उपकुलसचिव, महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदर परिपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालयांना / संस्थांना अवगत करुन द्यावे.
९. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Scanned with OKEN Scanner

# मुंबई विद्यापीठ

नॅक : अे++ श्रेणी
(CGPA 3.65)

डॉ. प्रसाद कारंडे
कुलसचिव


क्र. आईजी/२०२६/७१०५५

६ ऑक्टोबर, २०२६
१४ अश्विन, शकसंवत १९४८

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक – संकीर्ण २०२६/ई-१७६००८७/वि.शि.५ दिनांक २४ सप्टेंबर, २०२६

महोदय/महोदया,

उपरोक्त शासन निर्णयानुसार महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम, २०१६ च्या तरतुदीनुसार विद्यार्थी परिषद निवडणूकासंदर्भात अभ्यास व सल्लामसलत करण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समितीचे गठन करण्यात आले आहे. समितीने यासंदर्भात आपले कामकाज सुरु केले आहे.

विद्यार्थी परिषद निवडणुका निकोप, मुक्त व निर्भय, शांततापूर्ण, पारदर्शक वातावरणात पार पडण्यासाठी तसेच महाविद्यालये, विद्यापीठे यांच्या भागधारक (Stakeholder) यांची मते जाणून घेण्याचा समितीचा मानस आहे.

आपणास विनंती आहे की, आपल्या विद्यापीठातील मा. कुलगुरू, मा.प्र.कुलगुरू, मा. कुलसचिव, संचालक, विविध प्राधिकरणांचे प्रतिनिधी, तसेच शैक्षणिक संस्थांचे प्रमुख, व्यवस्थापन प्रतिनिधी, प्राचार्य, विभाग प्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, पालक तसेच विद्यार्थी यांचे सोबत जोडलेल्या प्रपत्रात नमूद मुद्यांच्या अनुषंगाने अभिप्राय संकलित करून त्याची संकलित PDF प्रत registrar@fort.mu.ac.in या e-mail वर पाठवावी.

धन्यवाद.

आपला

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ तथा सदस्य सचिव
विद्यार्थी परिषद निवडणुका समिती, महाराष्ट्र राज्य


**महात्मा गांधी मार्ग, फोर्ट परीसर, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी : ९१-२२-६८३२ ०००३.**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ, मुंबई ४०० ०९८.**

ईमेल.: registrar@fort.mu.ac.in वेबसाईट.: www.mu.ac.in

# महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत विद्यार्थी परिषद निवडणूक प्रश्नावली

विद्यापीठ / संस्था : ____________________________________________

पत्ता : ____________________________________________

पद : ____________________________________________

१. विद्यार्थी परिषद निवडणुका पूर्णतः निकोप वातावरणात पार पडण्यासाठी आपल्या सूचना.

1. Your suggestions for the student council elections to be held in a completely peaceful environment

२. विद्यार्थी परिषद निवडणुकीची प्रक्रिया सुलभ, गतिमान करण्यासाठी डिजिटल किंवा ऑनलाईन करण्याबाबतच्या आपल्या सूचना.

2. Your suggestions regarding digitizing or moving the student council election process online to make it streamlined and efficient.

३. विद्यार्थी परिषद निवडणुकांमध्ये राजकीय हस्तक्षेप टाळण्यासंदार्भातील आपल्या सूचना.

3. Your suggestions regarding avoiding political interference in student council elections.

४. विद्यार्थी परिषदेवर नामनिर्देशन करण्याबाबत आपल्या सूचना.

4. Your suggestions regarding nominations to the Student Council.

५. विद्यार्थी परिषद निवडणूक प्रक्रियेत शासन, प्रशासन व प्रशासकीय सहभाग कसा असावा या विषयीच्या आपल्या सूचना.

5. Your suggestions regarding the nature of the involvement of the government, administration, and administrative staff in the student council election process.

६. विद्यार्थी विकासासाठी विद्यार्थी परिषदेचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीकोनातून विद्यार्थी परिषद कर्तव्ये व जबाबदाऱ्या काय असाव्यात या बाबत आपले मत.

6. Your views on what the duties and responsibilities of the Student Council should be, with the aim of enhancing its participation in student development.

७. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने विद्यार्थी परिषद सहभाग कोणत्या पद्धतीने अधिक प्रभावी करता येईल या बाबत आपले मत.

7. Your views on how student council participation can be made more effective in alignment with the National Education Policy 2020.

८. विद्यार्थी परिषद निवडणूक नियमांचे उल्लंघन होऊ नये याकरिताचा उपाययोजना.

8. In order to comply with the rules of student council election the below mentioned precautionary measures are as follow.